# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय,

# राजगुरुनगर

## विद्यार्थी विकास मंडळ

### जनजागृती गौरव दिन

दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात 'जनजागृती गौरव दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थी कल्याण मंडळाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाचा उद्देश भगवान बिरसा मुंडा यांच्या कार्याचा व विचारांचा परिचय करून देणे तसेच सामाजिक समता, आदिवासी समाजाचे योगदान आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना विद्यार्थ्यांमध्ये दृढ करणे हा होता.

कार्यक्रमामध्ये भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर त्यांच्या जीवनकार्य, स्वातंत्र्यलढ्यातील योगदान आणि सामाजिक कार्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थितांना त्यांच्या विचारांचे महत्त्व पटवून देण्यात आले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम शांततापूर्ण व प्रेरणादायी वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला.

प्रा. के.डी. मांडगे

विद्यार्थी कल्याण मंडळ अधिकारी

साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालय


GPS Map Camera
Google
Rajgurunagar, Maharashtra, India
Rvxq+r7g, Rajgurunagar, Maharashtra 410505, India
Lat 18.849705° Long 73.888039°
14/11/2025 10:09 AM GMT +05:30


GPS Map Camera
Google
Rajgurunagar, Maharashtra, India
Rvxq+r7g, Rajgurunagar, Maharashtra 410505, India
Lat 18.849713° Long 73.888047°
14/11/2025 10:11 AM GMT +05:30